महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २९८ वे | दिनांक : २६/१०/२०२६ | वार : सोमवार

## महाराष्ट्र विकला जातोय, गप्प का? राज ठाकरेंचा सवाल



**मुंबई** : राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उद्योगपती गौतम अदानी यांच्या संबंधांवर भाष्य करणारी सबीर भाटिया यांची डॉक्युमेंट्री सोशल मीडियावर शेअर केल्यानंतर राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली. या व्हिडिओला अवघ्या काही वेळात 48लाखांहून अधिक व्ह्यूज मिळाले. मात्र, मुंबई पोलिस आयुक्तांनी केलेल्या विनंतीचा मान राखत ही पोस्ट डिलिट करत असल्याचे राज ठाकरेंनी स्पष्ट केले. माझा विरोध कोणत्याही व्यक्तीला नसून देशात निर्माण होत असलेल्या एकाधिकारशाहीला आहे, असा पुनरुच्चार त्यांनी या पोस्टद्वारे केला आहे. राज ठाकरे म्हणाले की, आपल्या डोळ्यांदेखत महाराष्ट्र विकला जात असताना राज्यातील खासदार-आमदार गप्प का? असा संतप्त सवाल विचारत त्यांनी सत्तेसमोर सरेंडर होणाऱ्या राजकीय नेत्यांच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. डॉक्युमेंट्री डिलीट केली तरी देशाच्या प्रबोधनासाठी ला लावलेली ठिणगी आता वणवा बनली असून एकाधिकारशाहीविरोधातील लढा यापुढेही कायम राहील. गौतम अदानी आणि नरेंद्र मोदी यांचा दोस्ताना कसा जुना आहे, आणि यातून अदानींच्या घशात भारतीय उद्योग विश्व कसं घातलं जात आहे याची पूर्ण माहिती देणारी सबीर भाटिया यांची डॉक्युमेंट्री मी माझ्या सोशल मीडियावर शेअर केली. त्याला 48 लाखांपेक्षा जास्त व्ह्यूज फक्त ट्विटरवर मिळाले, फेसबुकवर देखील प्रचंड रिस्पॉन्स मिळाला. हे झाले माझ्या सोशल मीडियावरचे व्ह्यूज, बाकी लोकांनी शेअर केलं ते वेगळं आणि त्यातून मिळालेले व्ह्यूज ची मोजदादच नाही, असे मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत म्हटले आहे. राज ठाकरे म्हणाले की, थोडक्यात हा गंभीर विषय लोकांपर्यंत पोहचला पाहिजे ही माझी इच्छा होती, तो हेतू साध्य झाला. अर्थात सबीर भाटियांनी ही डॉक्युमेंट्री आत्ता बनवली. पण त्याच्या आधीच जानेवारी 2026 ला मुंबईतील शिवतिर्थ येथून मी एक मोठं प्रेझेंटेशन केलं होतं, ज्यात अदानी समूह शब्दशः हा देश कसा गिळंकृत करायला निघाला आहे हे दाखवलं होतं. त्याला अद्वितीय असा प्रतिसाद मिळाला. ते व्हिडीओज आजही माझ्या सोशल मीडियावर आहेत. आम्ही जे सादरीकरण केलं त्यातल्याच काही क्लिप्स या डॉक्युमेंट्रीत पण वापरल्या गेल्या. असो. या विषयाच्या बाबत मी माझी भूमिका या आधी अनेकदा स्पष्ट केली आहे. माझा व्यक्तीला विरोध नाही तर एकाधिकारशाहीला विरोध आहे. मी माझ्या भाषणातून अनेकवेळा सांगितलं की पंतप्रधानांनी देशातील अनेक उद्योगपती मोठे करावेत आणि ज्यातून प्रचंड रोजगार या देशात निर्माण करावा आणि प्रचंड पैसा या देशात निर्माण व्हावा! तसेच या देशातील अनेक उद्योगपतींना जग पादाक्रांत करण्याची शक्ती द्यावी. सत्तेसमोर इतकं शरण जाणं महाराष्ट्राच्या इतिहासाला शोभणारे नाही राज ठाकरे म्हणाले की, पण ते सोडून जर एकाचेच लाड करणार असाल आणि त्याने देशाला धोका निर्माण होणार असेल तर आमचा त्याला विरोध आहे आणि यापुढेही राहील. त्यामुळे अदानीच काय कोणाच्याही एकाधिकारशाहीला विरोध असणारच आहे.

## संभाजीनगरात १५ हजारांच्या नफ्यासाठी पिस्तूल विक्री




**छत्रपती संभाजीनगर** : शहरातील उच्चभ्रू भागात राहणाऱ्या 6 पदवीधर तरुणांच्या टोळीला सिडको पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. जास्त नफा कमावण्यासाठी मध्य प्रदेशातून पिस्तूल आणून शहरात विकणारी ही साखळी होती. या कारवाईत पोलिसांनी 4 पिस्तूल आणि 11 जिवंत काडतुसे जप्त केली आहेत. पोलिस उपायुक्त रत्नाकर नवले आणि निरीक्षक अतुल येरमे यांनी ही माहिती दिली. मयूर पार्क आणि जाधववाडी भागात एका तरुणाने मध्य प्रदेशातून पिस्तूल आणल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सुरेवाडीतून शिवा अंबादास सुरे याला ताब्यात घेतले. त्याच्या माहितीवरून सुमीत विसपुते याच्या खोलीतील पाण्याच्या टाकीतून एक पिस्तूल आणि 2 काडतुसे जप्त करण्यात आली. या दोघांच्या चौकशीतून सत्यम चाटे आणि अर्जुन लिंगायत यांची नावे समोर आली. पोलिसांनी सत्यमच्या कमरेला अडकवलेले एक पिस्तूल जप्त केले. तर अर्जुनने जाधववाडी मोंढा भागातील झुडपात लपवलेली आणखी 2 देशी पिस्तूल पोलिसांच्या हवाली केली. उर्वरित काडतुसे श्रीकांत शिखरेकडून 5 आणि विशाल भोसलेकडून 4 याप्रमाणे जप्त करण्यात आली. आरोपींवर यापूर्वी दंगल, सायबर फसवणूक आणि मारहाणीचे गुन्हे दाखल आहेत. मध्य प्रदेशातील झारवट आणि उमरी येथील अड्ड्यांवरून 15 ते 20 हजार रुपयांना एक पिस्तूल आणले जायचे. पकडले जाण्याच्या भीतीने शस्त्रे एकाच जागी न ठेवता सर्वांमध्ये वाटून ठेवली जायची. गिऱ्हाईक शोधून हे तरुण एका पिस्तुलामागे 10 ते 20 हजार रुपयांचा नफा कमवत होते. त्यांनी एक पिस्तूल 35 हजार तर दुसरे 45 हजार रुपयांना विकल्याचे तपासात उघड झाले. बंटी दीक्षित खून प्रकरणातील आरोपी पवन पराशर याच्याकडे सापडलेले पिस्तूल आणि या टोळीकडून जप्त केलेले पिस्तूल एकाच बनावटीचे आहे. त्यामुळे दोन्ही गुन्ह्यांतील शस्त्रांचा मुख्य पुरवठादार एकच असल्याचा पोलिसांचा संशय असून त्यादृष्टीने तपास सुरू आहे.

## पुण्यात महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर; दोन गंभीर घटना

**पुणे** : पुणे शहर आणि परिसरात महिलांसह अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. कात्रज-कोंढवा रोडवरील सुखसागर नगर परिसरात मैत्रिणीची वाट पाहत थांबलेल्या १८ वर्षीय तरुणीची छेडछाड करून तिला जबरदस्तीने घेऊन जाण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. तर दुसरीकडे, सोशल मीडियावर सहलीतील डान्सचा व्हिडिओ टाकण्यावरून झालेल्या वादातून बावधन परिसरात नववीच्या विद्यार्थिनीवर चाकूने हल्ला करण्यात आला. या दोन्ही घटनांमुळे परिसरात चिंता व्यक्त केली जात आहे.पुण्यातील कात्रज-कोंढवा रोडवरील सुखसागर नगर परिसरात शनिवारी सायंकाळी ही घटना घडली. समर्थ डेअरीसमोर एक १८ वर्षीय तरुणी आपल्या मैत्रिणीची वाट पाहत थांबली होती. याच वेळी आरोपीने तिच्याजवळ जाऊन तिची छेडछाड केल्याचा आरोप आहे. त्याने तरुणीच्या छातीला हात लावून तिचा शर्ट ओढला आणि तिला जबरदस्तीने घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे तरुणी घाबरली. तिने आरडाओरड करून मदतीसाठी आवाज दिला. तिचा आवाज ऐकून जवळच असलेली तिची मैत्रीण आणि परिसरातील नागरिक तातडीने घटनास्थळी धावले. नागरिकांनी प्रसंगावधान राखत आरोपीला पकडले. त्यानंतर संतप्त नागरिकांनी त्याला मारहाण केली आणि पोलिसांच्या ताब्यात दिले. नागरिकांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे पुढील अनर्थ टळला. या प्रकरणातील आरोपीचे नाव जितू किशोरीलाल सरोज (वय ३०, मूळ रा. उत्तर प्रदेश) असे आहे. तरुणीने दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपीने तिच्याशी गैरवर्तन करत तिला घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी झालेल्या गोंधळात आरोपीने एका व्यक्तीचा मोबाइल जमिनीवर फेकून फोडल्याचाही आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले. भारती विद्यापीठ पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. सार्वजनिक ठिकाणी मैत्रिणीची वाट पाहत असलेल्या तरुणीसोबत घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २६ ऑक्टोबर २०२६


## बार्टीच्या पूर्णवेळ महासंचालक नियुक्तीसाठी अक्रम खान आणि सामाजिक कार्यकर्ते आक्रमक



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे येथे तातडीने पूर्णवेळ महासंचालकांची नियुक्ती करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडी प्रणित सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष अक्रम खान यांनी केली आहे. यासंदर्भात सामाजिक न्यायमंत्री तथा छत्रपती संभाजीनगरचे (औरंगाबाद) पालकमंत्री संजय शिरसाट यांना २४ ऑक्टोबर रोजी निवेदन देण्यात आले. बार्टीमध्ये सध्या प्रभारी महासंचालक कार्यरत असल्याने प्रशासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संशोधक विद्यार्थ्यांच्या फेलोशिपसंदर्भातील अनेक प्रश्न प्रलंबित असून, विविध प्रकल्पही रखडले आहेत. पूर्णवेळ महासंचालक नसल्यामुळे जात वैधता प्रमाणपत्रांच्या प्रक्रियेतही अनेक तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या परिस्थितीमुळे बार्टीच्या कामकाजाबाबत जनसामान्यांमध्ये नकारात्मक प्रतिमा निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे शासनाने तातडीने पूर्णवेळ महासंचालकांची नियुक्ती करून मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी दूर कराव्यात, अशी मागणी सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या वतीने करण्यात आली आहे. या निवेदनावर जिल्हाध्यक्ष अक्रम खान आणि सामाजिक कार्यकर्ते अमरदिप हिवराळे यांच्यासह अमोल घुगे, अमोल बोर्डे, क्षितिज सिंह आणि अरखम खान यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## नागपुरात भाड्याच्या खोलीत 37 लाखांच्या बनावट नोटा छापल्याचा प्रकार; आरोपी फरार



**नागपूर :** नागपूरमध्ये भाड्याच्या खोलीत बनावट नोटा छापल्याचे प्रकरण समोर आले आहे. आरोपीने अनेक महिन्यांपासून भाडे दिले नव्हते. घरमालकाने खोलीचे कुलूप तोडले असता, आत ₹५००च्या नोटांचे गठ्ठे, तसेच प्रिंटर आणि छपाईसाठी वापरले जाणारे साहित्य आढळले. जप्त करण्यात आलेल्या बनावट नोटांची एकूण किंमत सुमारे ₹३७ लाख असल्याचे सांगण्यात आले आहे. नोटा मोजण्यासाठी मशीन मागवावी लागली. आरोपी सध्या फरार आहे. आरोपीची ओळख पुष्पक कृष्ण भंडारकर ऊर्फ बेडाणे अशी झाली आहे. तो नागपूरमधील त्रिमूर्तीनगरचा रहिवासी आहे. त्याने सुमारे दीड वर्षापूर्वी खरबी परिसरात खोली भाड्याने तली होती. त्याचा भाडेकरार जानेवारीमध्ये संपला होता. त्यानंतर त्याने अनेक महिने भाडे दिले नाही. घरमालक रमेश यांनी त्याला खोली रिकामी करण्यास सांगितले असता, आरोपीने कथितरित्या चाकू दाखवून धमकावले. त्यानंतर घरमालकाने वाठोडा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. आरोपी बराच काळ खोलीवर आला नव्हता. शनिवारी घरमालकाने हातोड्याने खोलीचे कुलूप तोडले. आत एका बादलीत नोटांचे बंडल ठेवलेले होते. जमिनीवर कागद विखुरलेले होते आणि खोलीत प्रिंटरही बसवलेला होता. हे पाहून घरमालकाने तात्काळ पोलिसांना माहिती दिली. पोलीस घटनास्थळी पोहोचले असता तेथे ₹५०० च्या बनावट नोटांचे बंडल आढळले. नोटांची संख्या समजून घेण्यासाठी मोजणीचे यंत्र मागवण्यात आले. प्राथमिक तपासात समोर आले की, आरोपीने सुमारे ₹३७ लाखांच्या बनावट नोटा छापल्या होत्या. पोलिसांना घटनास्थळावरून अर्धवट छापलेल्या नोटा आणि छपाईसाठी वापरले जाणारे साहित्यही मिळाले. काही नोटांवर केवळ एका बाजूला छपाई झाली होती, तर दुसऱ्या बाजूचा भाग रिकामा होता. पोलिसांनी नोटा आणि इतर साहित्यांसह सुमारे ₹४८ लाख किमतीचे सामान जप्त केले आहे. पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत. तपासादरम्यान तो मुंबईत असल्याचे समोर आले. त्याला पकडण्यासाठी पोलिसांचे एक पथक मुंबईला पाठवण्याची तयारी केली जात आहे. प्रकरणाचा तपास सुरू आहे.

## पत्रकार सालेह मोहम्मद चाऊस यांना 'महात्मा गांधी गौरव पुरस्कार' प्रदान



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** परभणी आजतक न्यूज व जनसयोग सेवाभावी संस्थेच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते गौरवजिंतूर प्रतिनिधी : दैनिक दिव्य-वार्ता, दैनिक दलितवाणी व आज की आवाज या वर्तमानपत्रांचे पत्रकार सालेह मोहम्मद बाखताब (चाऊस) यांना पत्रकारितेतील कार्याची दखल घेत दिनांक २३ ऑक्टोबर २०२६ रोजी 'महात्मा गांधी गौरव पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. परभणी आजतक न्यूज व जनसयोग सेवाभावी संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.पत्रकार सालेह मोहम्मद बाखताब (चाऊस) हे विविध वर्तमानपत्रांच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक तसेच जनहिताच्या विषयांना वाचा फोडण्याचे कार्य करीत आहेत. त्यांच्या पत्रकारितेच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.या वेळी इंजिनिअर मगर साहेब, काजी वासेफ सिद्दीकी, शाहेद सिद्दीकी, मोईन मास्टर, पठाण सर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी सालेह मोहम्मद बाखताब (चाऊस) यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या पुरस्कारामुळे पत्रकार सालेह मोहम्मद बाखताब (चाऊस) यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, त्यांच्या या सन्मानाबद्दल आनंद व्यक्त केला जात आहे.

## प्रेमविवाहावरून येवल्यात लग्नमंडपात राडा; नवरदेवाला जाळण्याचा प्रयत्न, 7 ते 8 जखमी

**नाशिक :** प्रेमविवाह केल्याचा राग मनात धरून नवरीच्या नातेवाईकांनी लग्नसमारंभातच गोंधळ घातल्याची धक्कादायक घटना नाशिक जिल्ह्यातील येवला शहरात समोर आली आहे. पारंपरिक पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या विवाह सोहळ्यादरम्यान नवरदेव आणि त्याच्या नातेवाईकांच्या अंगावर डिझेल ओतून त्यांना जिवंत जाळण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेनंतर लग्नमंडपात दोन्ही बाजूंच्या नातेवाईकांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या राड्यात ७ ते ८ जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच येवला शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत काही संशयितांना ताब्यात घेतले. भरलग्नात घडलेल्या या प्रकारामुळे शहरात खळबळ उडाली आहे. **दोन महिन्यांपूर्वी प्रेमविवाह; पारंपरिक विवाह सोहळ्याचे आयोजन** मिळालेल्या माहितीनुसार, येवला शहरातील ऋषभ दीपक भगुंडे या तरुणाचे निफाड तालुक्यातील रामपूर नैताळे येथील एका तरुणीसोबत प्रेमसंबंध होते. दोघांनी कुटुंबीयांच्या विरोधाची पार्श्वभूमी असताना सप्टेंबर महिन्यात घरातून निघून प्रेमविवाह केल्याची माहिती आहे. या विवाहाला सुमारे दोन महिने झाले होते. त्यानंतर मुलाच्या नातेवाईकांनी दोघांचा विवाह पारंपरिक पद्धतीने आणि नातेवाईकांच्या उपस्थितीत पार पाडण्याचे ठरवले. त्यासाठी जवळपास १०० ते २०० नातेवाईकांना आमंत्रित करण्यात आले होते. येवला शहरातील एका लॉन्समध्ये विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. लग्नाची तयारी करण्यात आली होती. नातेवाईक आणि वऱ्हाडी मंडळींच्या उपस्थितीत विवाहाचे विधी सुरू असतानाच या सोहळ्याला हिंसक वळण लागले. विवाह सोहळा सुरू असताना नवरीच्या बाजूच्या काही नातेवाईकांनी प्रेमविवाहाचा राग मनात धरून लग्नमंडपात गोंधळ घातल्याचा आरोप आहे. संबंधित व्यक्ती डिझेलचे कॅन घेऊन आल्याची आणि त्यांनी नवरदेवासह त्याच्या नातेवाईकांच्या अंगावर डिझेल ओतून त्यांना जिवंत जाळण्याचा प्रयत्न केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकारामुळे विवाहस्थळी एकच गोंधळ उडाला. आनंदाच्या वातावरणात सुरू असलेल्या लग्नसमारंभात अचानक वाद निर्माण झाल्याने उपस्थित वऱ्हाडी मंडळींमध्ये भीतीचे वातावरण पसरले. काही जणांनी मध्यस्थी करून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले जात आहे. मात्र, वाद वाढत गेल्याने दोन्ही बाजूंच्या नातेवाईकांमध्ये धक्काबुक्की आणि मारहाण सुरू झाली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २६ ऑक्टोबर २०२६


## शिवाजी महाविद्यालयात 'विज्ञान मंच'चे दिमाखदार उद्घाटन; वैज्ञानिक जिज्ञासा व संशोधनावर मान्यवरांचा भर




**कन्नड** : शिवाजी महाविद्यालयात दिनांक २४ ऑक्टोबर रोजी 'विज्ञान मंच'चे औपचारिक उद्घाटन अत्यंत उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात पार पडले. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून श्री. विवेक भोसले यांनी बहुमूल्य वेळ दिला, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव आदरणीय चंद्रकांत देशमुख यांनी भूषवले.या महत्त्वपूर्ण सोहळ्यास संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. बाबासाहेब मोहिते आणि श्री. विशाल आहेर यांची विशेष उपस्थिती लाभली.मान्यवरांचे प्रभावी व प्रेरणादायी मनोगत * उद्घाटक श्री. विवेक भोसले: आजच्या वेगाने बदलणाऱ्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांमध्ये उपजत जिज्ञासा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे अत्यंत गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता प्रत्येक गोष्टीमागील 'विज्ञान' शोधण्याची सवय लावली पाहिजे, असे विचार उद्घाटक श्री. विवेक भोसले यांनी आपल्या उद्घाटनाच्या मनोगतातून मांडले. त्यांच्या या प्रभावी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवा उत्साह संचारला. * प्राचार्य विजय भोसले: महाविद्यालयाचे प्राचार्य विजय भोसले यांनी आपल्या मनोगतातून तरुणाईमध्ये वैज्ञानिक विचारसरणी आणि संशोधनाची आवड निर्माण करण्यासाठी अशा मंचांचे महत्त्व अत्यंत अभ्यासपूर्ण रीतीने अधोरेखित केले. विज्ञानामुळे समाज प्रगतीच्या मार्गावर वेगाने अग्रेसर होतो, असे प्रतिपादन त्यांनी केले.विज्ञान मंचच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती व कार्यक्रमाची रूपरेषाकार्यक्रमाची सुरुवात विज्ञान मंचचे अध्यक्ष आनंद दरेकर यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यानंतर सूत्रसंचालन कु. जान्हवी गाढे हिने अत्यंत ओघवत्या शैलीत पार पाडले. कार्यक्रमात पाहुण्यांचा परिचय विज्ञान मंचचे समन्वयक डॉ. डी. डब्ल्यू. शिंदे यांनी करून दिला.या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.बी के मगर,विज्ञान मंचचे सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये विज्ञान मंचचे डॉ. एस. एम. पवार, डॉ. टी. जे. जाधव, डॉ. एस. बी. कोल्हे, डॉ. पी. एस. आव्हाळे ,प्रा.सलीम शेख व डॉ बी के मगरे,डॉ. बी एच.गायकवाड,डॉ.ए आर.मेहेत्रे,डॉ.पी के संघई,प्रा.निर्मला पाटील,प्रा.सचिन उपाधे,प्रा दिपाली राठोड,प्रा.रेणुका जाधव आणि प्राध्यापक वर्ग मोठ्या संखेने उपस्थित होते. तसेच,महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी या उद्घाटनाला उपस्थित होते.

## 'शिंदेंनी हिंमत केली नसती तर भाजप सत्तेत नसती'; प्रतापराव जाधवांचा टोला



**मुंबई** : दीड वर्षापूर्वीची ऑडिओ क्लिप विधान परिषद निवडणुकीच्या नेमकी एक दिवस आधी बाहेर काढण्यात मनोज जरांगे पाटील यांचा हेतू काय आहे? याची सखोल चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी केंद्रीय राज्यमंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते प्रतापराव जाधव यांनी केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सुद्धा मराठा समाजाचं एक मोठं नेतृत्व आहेत. शिंदे यांचा गळा इतका नाजूक नाही की, तो कुणी केसाने कापेल. पण सध्या जे काही चाललं आहे ते चांगलं नाही, असेही जाधव यांनी स्पष्ट केले. तसेच एकनाथ शिंदेंनी ती हिंमत केली नसती तर भाजपला आज सत्ता दिसली नसती, असेही विधान जाधव यांनी केले आहे. जरांगे पाटील यांच्या आंदोलनासंदर्भात बोलताना प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की, आम्ही विदर्भातील ९९ टक्के मराठा-ओबीसी असतानाही जरांगेंच्या आंदोलनाला विरोध न करता नेहमी पाठिंबाच दिला आहे. यात आमच्याही मुलाबाळांचं नुकसान आहे, कारण ओबीसींची संख्या वाढली तर विदर्भातील आमच्याही पोराबाळांना फटका बसू शकतो. मात्र, केवळ सामाजिक बांधिलकी म्हणून आम्ही जरांगेंच्या आंदोलनाला पाठिंबा दिला. आम्ही ओबीसी असतानाही याला कधी विरोध केला नाही, अशी स्पष्ट भूमिका प्रतापराव जाधव यांनी मांडली. एकनाथ शिंदेंनी हिंमत केली नसती तर भाजपला सत्ता दिसली नसती पुढे बोलताना प्रतापराव जाधव म्हणाले, आम्ही ५० लोकांनी भाजपला मदत केली म्हणून भाजप सत्तेत आली. एकनाथ शिंदेंनी ती हिंमत केली नसती तर भाजपला सत्ता दिसली नसती. भाजपने महाराष्ट्रात कमी आमदार असून मुख्यमंत्री केलं नाही. तर बिहारमध्येही कमी आमदार असूनही नितीश कुमार यांना मुख्यमंत्री केलं. जर प्रवीण दरेकरांना आक्षेप घ्यायचा असेल तर त्यांनी एनडीएच्या नेत्यांवर व त्यांच्या निर्णयावर आक्षेप घ्यावा. मात्र एकनाथ शिंदे यांचा गळा इतका नाजूक नाही की, तो कुणी केसाने कापेल. जे काही चाललं आहे ते चांगलं नाही. आमचा आवाज कुणीही दाबू शकत नाही मनोज जरांगे पाटील यांचे आरोप गंभीर आहेत, त्याची चौकशी झालीच पाहिजे. जर या ऑडिओ क्लिपमध्ये भाजपच्या लोकांचं नाव येत असेल तर भाजपनेच सर्वात आधी याची चौकशी केली पाहिजे, अशी मागणी प्रतापराव जाधव यांनी केली आहे. तसेच आमचा आवाज कुणीही दाबू शकत नाही, जे सत्य आहे ते जनतेसमोर यायला हवं. गेली विधानसभा निवडणूक एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातच लढल्यामुळे इतकं यश मिळालं आहे. मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण हे एकनाथ शिंदे साहेबांनीच दिलं आहे, हे महाराष्ट्रातील जनतेला माहित आहे. एकनाथ शिंदे सारख्या नेतृत्वाला कुणी बदनाम करायचा प्रयत्न करत असेल तर सर्व सैनिकांच्या मनात चीड निर्माण झालेली आहे. श्रीकांत शिंदे सारख्या उभरत्या नेतृत्वाला सुद्धा बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे. काँग्रेस हा संपलेला विषय आहे. त्यामुळे ते कुठल्यातरी माध्यमातून जनाधार शोधण्याचा प्रयत्न करतात, अशी टीका जाधव यांनी केली आहे.

## नव्या मराठी म्हणी

*१) अभ्यासात कमी,*
*कॉपीची हमी !*

*२) घरात माणसे चार,*
*कामवाल्या फार !*

*३) मोबाईल करी,*
*विश्व आले घरी !*

*४) दिवसभर चारचाक,*
*पहाटे उठून मॉर्निंगवाक!*

*५) सत्संगात गेला,*
*पोटभर जेवून आला !*

*६) टिकली भिंतीला,*
*मंगळसूत्र खुंटीला !*

*७) जीवन झाले फाईन,*
*सर्वत्र ऑनलाईन !*

*८). फॅशनचे झटके,*
*कपडे घाली फाटके !*

*९) खाली मुंडी*
*नेट धुंडी !*

*१०) जुने दिवस गेले,*
*आता डे आले !*

*११) कशी आली वेळ,*
*सर्वत्र पैशाचा खेळ !*

*१२) खायची नाही गती,*
*पण मोबाईल हाती !*

***प्रा डॉ राजेंद्र सोनवणे***
***जालना***
***भ्रमणध्वनी*-**
***९४२१३१९२७०***

## सर्वांच्या अंगणात चांदणं

पुन्हा एकदा आली आज कोजागिरी,
घराघरांत उकळणाऱ्या दुधाचा सुवास
बाल्कनीत सेल्फी, सर्वांची
छायाचित्रगिरी
आणि डोळ्यांत चांदणं आभास

पण अजूनही कुठेतरी
त्या झोपडीत अंधार आहे.
तिथे चांदणं पोचत नाही,
कारण भुकेच्या धुरानं आभाळ
झाकलंय.

कोणी दुधात बदाम टाकतो,
कोणी पाण्यात हात धुतो;
कोजागिरीचा आनंद
सगळ्यांना सारखा नसतो.

चंद्र मात्र थांबून पाहतो —
तो भेद करत नाही,
तो उजळतो सर्वांना,
फरक फक्त आपल्या मनात.

ही चांदणी सांगते —
"जागा, पण फक्त चंद्रासाठी नव्हे,
जागा विवेकासाठी, न्यायासाठी,
त्या थंड मनांना ऊब देण्यासाठी."

कोजागिरीची रात्र सुंदर आहे,
पण तिचं खरं सौंदर्य तेव्हाच —
जेव्हा चांदणं सगळ्यांच्या अंगणात
उतरलेलं असेल.



**संदिप नानासाहेब वाकडे**
**रा. खेडा ता.कन्नड**

## राष्ट्रीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत किंजल सोनवणे हिला रौप्यपदक

**दौलताबाद (जावेद अहमद) :** पाच सलग विजयांसह अंतिम फेरीत धडक; महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरामहाराष्ट्राची युवा तायक्वांदो खेळाडू कु. किंजल निलेश सोनवणे हिने 70 व्या शालेय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत (SGFI) रौप्यपदक पटकावून राज्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे क्रीडा क्षेत्रातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.श्रीनगर येथे 21 ते 26 ऑक्टोबर 2026 या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या राष्ट्रीय स्पर्धेत किंजलने महाराष्ट्राच्या सीबीएसई संघाचे प्रतिनिधित्व केले. तिने उत्कृष्ट कौशल्य, आत्मविश्वास, जिद्द आणि लढाऊ वृत्तीच्या जोरावर अंतिम फेरीपर्यंत मजल मारली.स्पर्धेच्या प्राथमिक फेऱ्यांमध्ये किंजलने दमदार कामगिरी करत प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवले. तिने पहिल्या सामन्यात पश्चिम बंगाल, दुसऱ्या सामन्यात छत्तीसगड, तिसऱ्या सामन्यात गोवा, चौथ्या सामन्यात मिझोराम आणि पाचव्या सामन्यात लडाखच्या खेळाडूचा 2-0 असा पराभव केला. सलग पाच विजय मिळवत तिने अंतिम फेरीत प्रवेश केला.अंतिम सामन्यात आसामच्या खेळाडूविरुद्ध किंजलने चुरशीची लढत दिली. मात्र, या अटीतटीच्या सामन्यात तिला 1-2 असा पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे तिला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. पाच सलग विजय मिळवत अंतिम फेरीपर्यंत पोहोचण्याची तिची कामगिरी विशेष कौतुकास्पद ठरली.किंजलचे हे यश तिच्या कठोर परिश्रमाचे, सातत्यपूर्ण सरावाचे आणि खेळाप्रती असलेल्या समर्पणाचे फलित आहे. राष्ट्रीय स्तरावरील या यशामुळे महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २६ ऑक्टोबर २०२६

## अन् तो कवी झाला

तो
चॅट जीपीटी कडून
लिहून घेऊ लागला
त्यानं न पाहिलेलं जग
अन् न भोगलेलं आयुष्यं
कवी म्हणवून घेण्यासाठी..

उसन्या अनुभवाना
तो देऊ लागला
कवितेचं रूप
अन् गाजवून घेऊ लागला
सोशल मीडियात कवी म्हणून..

तसा
तो पुर्वी ही लिहायचा कविता
आपल्या वकुब अन् अनुभवाने
अस्सल माय बोलीत..

आता
तो विसरून गेला
आईची भाषा
चॅट जीपीटीच्या
उसन्या प्रमाण भाषेला बळी पडून..

तो विसरलाय आता
बुद्धी चालवायला
कविता आयती लिहून मिळू लागल्या पासून..

आताशा
या चॅट जीपीटीचं करावा काय?
हा प्रश्न पडला म्हणे कवितेला
तेव्हा हा प्रश्न ही तो
चॅट जीपीटीला विचारू लागला..

अन् गहाण ठेवलेल्या मेंदूला
रोज कवितेच्या नावानं
चॅटा मारू मारू
तो कवी झाला..

**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

# खरगेंच्या वक्तव्याने राजकीय वाद; अमित शहांचा पलटवार, पाटण्यात मारहाणीची घटना

**पाटणा** : रविवारी पाटणा येथे काँग्रेसच्या एका कार्यक्रमात गोंधळ उडाला. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे बापू सभागृहात भाषण देत होते. एक व्यक्ती उभा राहिला आणि म्हणाला, "मोदी जाणार नाहीत. जोपर्यंत देशात बंड होत नाही, तोपर्यंत मोदी सरकार हटवले जाणार नाही.“ यावर खरगे संतापले आणि म्हणाले, "फक्त मोदीच नाही, तर मोदींचा बापही जाईल." त्यांनी हे विधान तीन वेळा केले. यानंतर, "मोदी जाणार नाहीत" असे म्हणणाऱ्या त्या व्यक्तीला तेथे उपस्थित असलेल्या लोकांनी मारहाण केली. मल्लिकार्जुन खरगे पाटणा येथे बिहारचे पहिले मुख्यमंत्री डॉ. श्रीकृष्ण सिंह यांच्या 139 व्या जयंती सोहळ्याला संबोधित करत होते. गृहमंत्री अमित शहा म्हणाले, काँग्रेस अध्यक्ष खरगे यांनी पंतप्रधानांच्या वडिलांबद्दल असभ्य टिप्पणी करून सभ्यतेच्या सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. काँग्रेस पक्षाने मोदी किंवा त्यांच्या कुटुंबाविरुद्ध अपमानास्पद भाषा वापरण्याची ही पहिली वेळ नाही. कधी त्यांनी त्यांच्या आईबद्दल अपमानास्पद भाषा वापरली, कधी त्यांना 'मृत्यूचा व्यापारी' म्हटले, तर कधी 'चहा विक्रेता' म्हणून त्यांच्या गरिबीची खिल्ली उडवली. राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्ष दररोज असभ्यतेच्या मर्यादा ओलांडत आहे."27 ऑगस्ट, 2025 रोजी, बिहारमधील दरभंगा येथे राहुल गांधींच्या वोटर अधिकार यात्रेदरम्यान पंतप्रधान मोदींच्या आईचा अपमान करण्यात आला. बिहार बंदची हाक देण्यात आली आणि निदर्शनेही झाली. पाटणा येथे भाजप आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये संघर्ष झाला आणि अनेक वाहनांची तोडफोड करण्यात आली. खरगे म्हणाले की, नितीश कुमार समाजवादी विचारधारा घेऊन पुढे गेले, मात्र आता ते भाजप-आरएसएसच्या कुशीत जाऊन बसले आहेत. जेव्हा माणसामध्ये कमकुवतपणा येतो, तेव्हा त्याचा विचारसरणीवरील विश्वास उडून जातो. आम्हाला तर सगळ्यांनी मारले, तरीही मी आणि माझे नेते राहुल गांधी जिवंत आहोत आणि लढत आहोत. लोकांसाठी मरत आहोत. जोपर्यंत या देशात RSS ची विचारसरणी संपणार नाही, तोपर्यंत या देशात शांतता येणार नाही. शांतता भंग करणारे हेच लोक आहेत. आजही अस्पृश्यता पाळणारे लोक RSS मध्ये भरलेले आहेत. बिहारमध्ये लोकशाही मजबूत करणारे नायक होते श्री बाबू काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षांनी म्हटले की, आधुनिक बिहारमध्ये लोकशाही मजबूत करणारे श्री बाबू हे नायक होते. आज अनेक ठिकाणी जमीन सुधारणांचे कायदे लागू झाले आहेत, त्यासाठी इंदिरा गांधी यांनी खूप काम केले होते. 1937 मध्ये बिहारमध्ये काँग्रेसचे पहिले सरकार श्रीकृष्ण बाबू यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाले. त्यानंतर 1947 मध्ये स्वतंत्र भारतात बिहारमध्ये सरकार स्थापन झाले. त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात जमीनदारी प्रथा रद्द करण्यात आली, भूमिसुधारणा करण्यात आल्या आणि चकबंदी कायदा आणण्यात आला.

# ऑडिओ क्लिप प्रकरणी जरांगेंचा फडणवीस-शिंदेंना इशारा; तपासाची मागणी



**जालना** : पडद्यामागची सत्य परिस्थिती जनतेसमोर आल्यास सरकारची प्रतिमा मलिन होईल, या भीतीपोटी ही ऑडिओ क्लिप खोटी ठरवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या प्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वस्तुस्थिती समोर आणली पाहिजे, असे सांगत जर त्यांनी या प्रकरणाचा सखोल तपास केला नाही, तर हा कट त्यांनीच घडवून आणला होता, असा संदेश महाराष्ट्रातील जनतेमध्ये जाईल, असा गंभीर इशारा मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मी देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यावर विश्वास ठेवला आहे. ते या ऑडिओ क्लिपचा खरा तपास नक्की करतील. मात्र, ही क्लिप खोटी असल्याचे भासवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात असल्याचे माझ्या कानावर आले आहे. हे प्रकरण समोर आल्यानंतर अनेकांच्या पायाखालची जमीन सरकली आहे. ही क्लिप खरी असेल, तर नेमके ते पैसे कुठून आणले? ते शिंदेंना का दिले नाहीत? ते कशासाठी आणले होते? आणि देवेंद्र फडणवीस यांना गोत्यात आणण्याचा प्रयत्न होता का? यांसारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे सरकारला द्यावी लागतील. ही क्लिप खरी असल्याचे लपवण्यासाठी आणि विरोधकांना बदनाम करण्यासाठी ती खोटी असल्याचे भासवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला. समाजासाठी लढा सुरूच राहणार मनोज जरांगे पाटील म्हणाले की, समाजाशी कधीही विश्वासघात करायचा नाही आणि समाजासाठीच आपला जीव द्यायचा, या निश्चयाने मी लढत आहे. मी सर्व सत्य बाजू समाजासमोर मांडत असून, मी मागे हटणार नाही. परंतु, आपणच निवडून दिलेले सरकार कधीकधी किती त्रास देते, हे सहन होत नाही. खऱ्या माणसांना पावला-पावलावर त्रास दिला जात असून, सरकारकडून जीव घेण्याचे प्रयत्न केले जात आहेत, अशा यातना मला सहन कराव्या लागत आहेत. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, यापूर्वी ती ऑडिओ क्लिप खरी असल्याचे सांगणारे नेते आता ती 'एआय' (AI) द्वारे तयार केल्याचा दावा करत आहेत. सत्तेत एकत्र राहण्यासाठी आणि एकमेकांना वाचवण्यासाठी हे सर्व सुरू असून, यामागे सत्य लपवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा गंभीर आरोप मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. यापूर्वी भाजप आणि शिवसेनेचे नेते या प्रकरणावर उघडपणे बोलत होते; परंतु आता मित्रपक्षांविरोधात काहीही बोलू नये, असे त्यांना सांगण्यात आले आहे. ही ऑडिओ क्लिप खरी असल्याचे आता सिद्ध झाले आहे, परंतु सत्तेच्या राजकारणासाठी हे सत्य पुढे येऊ दिले जात नाही. आमच्याच माणसांकडून आम्हाला त्रास मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मराठा समाजाचा मोठा पाठिंबा देऊन एकनाथ शिंदे मोठे व्हावे, यासाठी आम्ही सर्वतोपरी मदत केली. मात्र, त्याच माणसांकडून आज आम्हाला असा त्रास व्हावा, ही महाराष्ट्राच्या दृष्टीने खूप मोठी शोकांतिका आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002